**<u>ठळक बातम्या</u>**

- ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त नवी दिल्लीत ग्रंथ दिंडीचं आयोजन, दुपारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

- राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला सुरुवात, बदनापूरमध्ये पेपर फुटला नसल्याचं जिल्हाधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण

- जेनेरिक औषध केंद्रांच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करणार असल्याची केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती

- मुंबई उच्च न्यायालयात तीन न्यायाधीशांच्या स्थायी नियुक्तीला न्यायवृंदांची मंजुरी

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भाविरुद्धच्या सामन्यात मुंबई पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून ९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदा, ७१ वर्षानंतर हे संमेलन नवी दिल्लीत होतंय. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारं हे पहिलंच संमेलन आहे. त्यानिमित्त सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. त्यात विविध साहित्यिक, राजकारणी, साहित्य प्रेमी, चित्ररथ सहभागी झाले होते.

डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचं उद्घाटन दुपारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. संध्याकाळी साडे ६ वाजता माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे उद्घाटन सत्र होईल. त्यात गेल्या संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे आणि या संमेलनाच्या

अध्यक्ष तारा भवाळकर यांचं भाषण होईल. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

राज्य सरकारनं या संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. यंदा राज्यातल्या ५ हजार १३० मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून १६ लाख ११ हजार ६१०विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यातल्या बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला नसल्याचं जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्पष्ट केलं. स्थानिक झेरॉक्स दुकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली आहे. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही, असं ते म्हणाले. याठिकाणी झालेल्या दगडफेकीप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

छत्रपती संभाजी महाराजांवरचा आक्षेपार्ह मजकूर न काढल्याबद्दल महाराष्ट्र सायबर विभागाने विकिपीडियाच्या चार संपादकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाचं संपादन करणाऱ्या कॅलिफोर्निया इथल्या विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून मजकूर काढून टाकण्याची विनंती करण्यात आली होती. नोटीस पाठवूनही हा मजकूर हटवण्यात आलेला नाही. अशा प्रकारचा मजकूर माहितीच्या

स्रोतावर झळकत राहिला तर राज्यात तणावाचं वातावरण निर्माण होऊ शकतं, त्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सायबर विभागानं दिली आहे.

**<><><><><>**

राज्याचे उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बच्या साह्याने उडवण्याची धमकी देणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातल्या दोन संशयितांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. या दोघांनी ई-मेलद्वारे दिलेल्या धमकीचे मेसेज गोरेगाव तसंच जे जे मार्ग पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे. या प्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे.

**<><><><><>**

जेनेरिक औषध केंद्रांच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करणार असल्याची माहिती केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. तसंच भविष्यात आयुष मंत्रालयाच्या कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळा आणि ‘देश का प्रकृती परीक्षण’ मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. देश का प्रकृति परीक्षण अभियानाचा पहिला टप्पा २५ डिसेंबर रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाला. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यांचा तसंच आयुर्वेदिक महाविद्यालयांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी वैद्य माया राम उनियाल, वैद्य ताराचंद शर्मा, वैद्य समीर गोविंद जमदग्नी यांना धन्वंतरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृदांने मुंबई उच्च न्यायालयामधल्या तीन अतिरिक्त न्यायाधीशांची स्थायी न्यायाधीश म्हणून नियुक्ती करायला मंजुरी दिली. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या न्यायवृंदाच्या

बैठकीत हा निर्णय झाला. शैलेश ब्रह्मे, फिरदौश पुनावाला आणि जितेंद्र शांतिलाल जैन यांची स्थायी न्यायाधीश म्हणून नियुक्ती करायला न्यायवृंदाने मान्यता दिली आहे.

यासोबतच मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांना एका वर्षाची मुदतवाढ देण्याची शिफारसही न्यायवृंदाने केली आहे.

**<><><><><>**

लघुकालीन नफ्याच्या मागे धावताना नागरिकांनी दीर्घकालीन वित्तीय सुरक्षेकडे दुर्लक्ष करु नये, असा सल्ला रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर एम. नागेश्वर राव यांनी दिला आहे. मुंबईत राष्ट्रीय शेअर बाजारात आयोजित आर्थिक परिषदेत ते बोलत होते. नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरतेचा अभाव असल्यानं या गोष्टी होतात. आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी रिझर्व्ह बँक इतर वित्तीय नियामकांसोबत काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

बँका आणि वित्तीय संस्थांनी डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली नाही, ग्राहककेंद्री भूमिका घेतली नाही आणि डेटाच्या आधारे निर्णय घेतले नाही तर त्या कालबाह्य होतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. बाहेरुन विकत घेतलं जाणारं तंत्रज्ञान विकत घेताना नियामकांचे दिशानिर्देश आणि ग्राहकांच्या हक्कांचं रक्षण करण्यासाठी खबरदारी घेण्याचा इशारा त्यांनी दिला.

**<><><><><>**

गेल्या काही आठवड्यात शेअर बाजारात स्मॉल कॅप आणि मिड कॅप क्षेत्रातल्या समभागांमध्ये घसरण झाली आहे. त्यावर नियामक म्हणून काहीही प्रतिक्रिया देण्याची गरज नसल्याचं मत सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बूच यांनी व्यक्त केलं आहे. मुंबईत काल म्युच्युअल फंडांच्या संघटनेच्या परिषदेत त्या बोलत होत्या.

**<><><><><>**

वेगवेगळ्या भाषांमधल्या नाटकांच्या माध्यमातून होणाऱ्या दृष्टिकोन बदलासाठी नाट्यमहोत्सवाची गरज असल्याचं प्रतिपादन ज्येष्ठ दिग्दर्शक वामन केंद्रे यांनी केलं. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त नाट्य परिषदेतर्फे आयोजित विशेष नाट्य महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मुंबईत ते काल बोलत होते. या महोत्सवाचं उद्घाटन अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते झालं. यावेळी नाट्य परिषदेचे विश्वस्त अशोक हांडे, शशी प्रभू यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. २० फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत हा नाट्य महोत्सव यशवंत नाट्य मंदिर, जयश्री आणि जयंत साळगांवकर प्रायोगिक रंगमंच, अण्णाभाऊ साठे नाट्यगृह या ठिकाणी रंगणार आहे.

**<><><><><>**

भारतीय वन्यजीव शास्त्रज्ञ पूर्णिमा देवी बर्मन यांना टाईम मासिकानं “वुमन ऑफ द इयर” म्हणून सन्मानित केलं आहे. या यादीत स्थान मिळवणाऱ्या पूर्णिमा देवी या एकमेव भारतीय महिला आहेत. आसाममध्ये दुर्मिळ होत असलेल्या हरगिला म्हणजेच मोठा करकोचा या पक्षाच्या संरक्षणासाठी त्या प्रयत्न करत आहेत.  जगात अतिशय दुर्मिळ असलेल्या या प्रजातींच्या घट झाल्यामुळे या भागात करकोचा पक्षाच्या फक्त साडेचारशे प्रजाती उरल्या आहेत. मात्र बर्मन यांच्या अथक प्रयत्नांमुळे आसाममध्ये या पक्षाची लोकसंख्या अठराशेहून अधिक झाली आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भ यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई पराभवायाच्या छायेत आहे. या सामन्यात विजयासाठी ४०६ धावांचा पाठलाग करताना, दुसऱ्या डावात मुंबईच्या ९ बाद ३१४ धावा झाल्या होत्या.

आज सामन्याच्या पाचव्या दिवशी मुंबईनं आपला दुसरा डाव कालच्या ३ बाद ८३ या धावसंख्येवरून पुढे सुरू केल्यानंतर शिवम दुबे, सुर्यकुमार यादव आणि

आणि आकाश आनंद हे मुंबईचे फलंदाज झटपट माघारी परतले. त्यानंतर शम्स मुलानी आणि शार्दुल ठाकूर यांनी शतकी भागीदारी करत मुंबईचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. शार्दुल ठाकूर ६६ तर शम्स मुलानी ४६ धावा करून बाद झाला.

मुंबईनं हा सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवलं, तरी विदर्भानं पहिल्या डावात मिळवलेल्या आघाडीच्या जोरावर ते अंतिम फेरीत जाऊ शकणार आहेत.

दरम्यान अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात आज पाचव्या दिवशी केरळनं गुजरातवर पहिल्या डावात २ धावांची नाममात्र पण महत्वाची आघाडी मिळवली.

**//<><><><><>//**